अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



उपवासासाठी स्पेशल
टक्कर
मलाई लस्सी
कैलास उडपी। लस्सी
शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालया समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २२.०८.२०२५ | अंक नं. १२२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



बाप्पाच्या स्वागतासाठी आपण सज्ज व्हा,
सजविण्यासाठी आम्ही सज्ज आहोत..
बाप्पाला सजविण्यासाठी 500 पेक्षाही अधिक डिझाईनमधील चांदीच्या आकर्षक मुर्ती व दागिने
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02


# रस्त्याच्या नियोजनशून्य कामामुळे नागरिकांचे हाल

नगर – नगर मनमाड रस्त्याचे रुंदीकरण आणि मजबुतीकरणाचे काम राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून सुरु असून यासाठी नेमलेल्या ठेकेदार संस्थेच्या वतीने हे काम करताना योग्य नियोजन आणि प्रवाशांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष केल्याने प्रवाशांचे सध्या मोठे हाल होत आहेत. या मुळे दररोज छोटे मोठे अपघात होत असून याबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे पत्र महामार्ग वाहतूक पोलिसांकडून देण्यात आले आहे. तर शिवसेनेनेही तातडीने उपाययोजना न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

सध्या नगर जामखेड रोड चे काम अतिशय वेगाने सुरु आहे. परंतु काम करत असतांना सर्व रस्ता खोदून ठेवला आहे सध्या पावसाळा असल्याने सर्व रस्त्यावर सर्वत्र चिखल झाला आहे. तसेच ठिकठिकाणी रस्ता खचला आहे, रस्त्यावरून दुचाक्यांची चाके चिखलाने जाम होत असल्याने दुचाकी चालक पूर्ण पणे वैतागले आहेत. तसेच दुचाकी चालवाताना गाड्या घसरून अपघात होत आहेत. चारचाकी वाहन खालून घासत आहेत, ट्रक एस टी बसेस



रस्त्याच्या कामासाठी खोदाई केल्याने चिखलात खचणारी वाहने दिसत आहेत.

रस्त्यावर चिखलात खचत आहेत. एकंदरीत रस्त्याचे काम करणारी कंपनी लोकांची व पर्यायी वाहतुकीची कुठल्याही प्रकारची काळजी घेत नाही. तसेच काम सुरु असताना घ्यावयाची कुठलेही नियम पाळत नाहीत त्यामुळे एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सदर बाब लक्षात घेवून आपण तातडीने सदर ठेकेदार कंपनीला सूचना देवून रस्ता साफ करुन व्यवस्थित रोलिंग करावी अन्यथा नाइलजाने जामखेड रोड वरील सर्व लोकांच्या हितासाठी रस्त्यावर ठिय्या आंदोलन व रस्ता वाहतुकीस योग्य होत नाही तोपर्यंत ठेकेदारचे पुढील खोदईचे काम बंद करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबतचे निवेदन माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. यावेळी माजी पंचायत समिती सभापती रामदास भोर, प्रकाश कुलट, अशोक ढगे, बाबासाहेब काळे आदी उपस्थित होते.

### महामार्ग वाहतूक पोलिसांच्या सूचना

नगर ते जामखेड रोडचे काम चालु असुन सध्या रस्त्याचे खोदकाम केलेले असुन मातीचा पावसाचे पाण्यामुळे चिखल झालेला


(वृत्त व छायाचित्र पान २ वर)




भिगार परिसरातील सावतानगर पंपिंग स्टेशन ते पंचशील कमान हा मुख्य रस्ता पावसामुळे खड्डेमय झाला असून नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. वृत्त पान २ वर.....

# गांजाच्या गुन्ह्यात आरोपी न करण्यासाठी पोलिसाने मागितली लाच; मध्यस्ती करणाऱ्या नेत्याला दीड लाख रुपये घेताना रंगेहाथ पकडले

### नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाची कारवाई

नगर – गांजा तस्करीच्या गुन्ह्यात आरोपी न करता साक्षीदार करण्यासाठी तक्रारदाराकडे कोतवाली पोलीस ठाण्यातील गोपनीय शाखेत कार्यरत सहाय्यक फौजदार राजेंद्र प्रभाकर गर्गे (वय ५७, रा. समर्थनगर सावेडी) यांच्या करिता ५ लाख रुपयांची लाच मागत तडजोडी अंती १ लाख ५० हजार रुपये स्विकारताना अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अशोक रामचंद्र गायकवाड (वय ७१, रा. बिशोप लॉइड कॉलनी, सावेडी) यांना नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने २१ ऑगस्ट रोजी रात्री सापळा लावून रंगेहाथ पकडले आहे. या दोघांवर तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी की, यातील तक्रारदार यांना कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गांजाच्या गुन्ह्यामध्ये आरोपी न करता साक्षीदार करण्याच्या मोबदल्यात कोतवाली पोलीस स्टेशनचे सहाय्यक फौजदार राजेंद्र गर्गे यांचे मध्यस्थी करणारे अशोक रामचंद्र गायकवाड यांनी २० ऑगस्ट रोजी तक्रारदार यांच्याकडे तडजोडी अंती १ लाख ५० हजार रुपये लाचेची मागणी केलेली आहे. सदर मागणीस सहाय्यक फौजदार राजेंद्र गर्गे यांनी प्रोत्साहन दिल्याचे लाच मागणी कारवाई दरम्यान स्पष्ट झालेले आहे. तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्याने याबाबत नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली.

त्यामुळे ला.प्र.वि, नाशिक परिक्षेत्रचे पोलिस अधिक्षक भारत तांगडे, अप्पर पोलिस अधिक्षक माधव रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस निरीक्षक नेहा सूर्यवंशी, पोलीस हवालदार विनोद चौधरी, चालक पोलीस हवालदार विनोद पवार, पो. कॉ. अनिल गांगोडे यांच्या पथकाने २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी सावेडी परिसरात सापळा लावून अशोक गायकवाड यांना तक्रारदाराकडून १ लाख ५० हजार रुपये लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर या पथकाने सहाय्यक फौजदार राजेंद्र गर्गे यांनाही ताब्यात घेतले. या दोघांच्या विरुध्द २२ ऑगस्ट रोजी सकाळी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याच्या पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नगरचे पोलिस उपअधिक्षक अजित त्रिपुटे यांच्याकडे देण्यात आला आहे.


गणपतीची स्वारी आली दारी
गुरु सुपरमार्केट च्या ऑफर्स आहेत भारी !
Guru PREMIUM DRY FRUITS
बदाम कॅलिफोर्निया 250g MRP : ₹275/- OFFER ₹240/-
काजू गोवा 250g MRP : ₹300/- OFFER ₹275/-
प्रि. किशमिश 250g MRP : ₹175/- OFFER ₹140/-
गुरु ब्लॅक खजूर 500g MRP : ₹175/- OFFER ₹160/-
पिवळी खारीक स्लाइस 250g MRP : ₹125/- OFFER ₹110/-
बदाम स्लाइस 100g MRP : ₹110/- OFFER ₹99/-
पिस्ता स्लाइस 100g MRP : ₹280/- OFFER ₹240/-
चारोळी बोल्ड 50g MRP : ₹160/- OFFER ₹130/-
मोदक पीठ खोबरा किस अक्रोट मगज
मिक्स ड्रायफ्रूट 250g MRP : ₹250/- OFFER ₹230/-
केशर १/२ ग्रा. MRP : ₹225/- OFFER ₹149/-
सीडलेस खजूर रोस्टेड काजू रोस्टेड बदाम
90+ VARIETY OF DRYFRUITS
गुरु सुपरमार्केट माऊली संकुल समोर
झोपडी कँटीन मागे, अहिल्यानगर
फोन :०२४१-२४१७५७५
सोमवार बंद !



SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज



डॉ.योगेश सिसोदिया (M.S.ORTHO)
गुडघेदुखी,सांध्याचे आजार, लिगामेंट व स्पोर्टस् इंज्युरी तज्ञ.
संलग्न हॉस्पिटल
संचेती हॉस्पिटल (पुणे) | साईदीप हॉस्पिटल (नगर) : दर शनिवारी
अहमदनगर व्हिजीट : साईदीप हॉस्पिटल
दर शनिवारी : वेळ सकाळी ९ ते ११ (अपॉईंटमेंटसाठी संपर्क)
9860267116 / 7387393683



CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769



पुरुषांसाठी ब्रँण्डेड शर्ट
(3XL, 4XL पर्यंत) Rs.550/- ला 1 Rs.1500/- ला 3
(2XL, 3XL, 4XL पर्यंत) Rs.400/- ला 1 Rs.1200/- ला 3
Terms & Conditions Apply.
जिन्स व फॉर्मल पॅन्ट साईज ३४ पर्यंत Rs.1200/- ला 3 व साईज 36 पासून पुढे Rs.1500/- ला 3, मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८



बाथरूम मधल्या शॉवर किंवा बॉडी जेटला प्रेशर कमी येतोय का?
तर आजच घेऊन या प्रेशर बूस्टर पंप आणि बनवा आपलं बाथरूम आनंददायी
अधिकृत विक्रेते!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# उर्दू शाळेतील चौघा शिक्षकांना बेकायदेशीर मान्यता दिल्याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील तिघांविरूध्द गुन्हा दाखल

नगर - जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात शिर्डी येथील उर्दू शाळेत अधिकार नसताना बेकायदेशीरपणे शिक्षकांच्या पदाला वैयक्तिक मान्यता दिल्याचे चौकशीत समोर आले आहे. या प्रकरणात तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी व इतर जबाबदार कर्मचाऱ्यांच्या विरोधात २१ ऑगस्ट रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रभारी उपशिक्षणाधिकारी विलास अशोक साठे (वय ५०, रा. विधाते हायस्कूल मागे, सारसनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे.

तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी सुलोचना पंढरीनाथ पटारे, तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक जे. के वाघ (मयत) व शिर्डी उर्दू एज्युकेशन सोसायटी पुनमनगर, शिर्डी (ता. राहाता) या संस्थेचे तत्कालीन सचिव रज्जाक अहमद शेख (मयत) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. प्रभारी उप शिक्षणाधिकारी विलास साठे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शासन निर्णय २४ एप्रिल २०२३ अन्वये आवक/जावक नोंदवहीचा शोध घेऊनही ती मिळत नसल्यास या प्रकरणाची सखोल तपासणी करून जबाबदार व्यक्तींवर गुन्हा नोंदविण्याचे निर्देश शासनाने दिले होते. त्यानुसार दोषी असणार्या अधिकारी व कर्मचारी यांची नावे, पदनाम, निश्चित करून जबाबदारी निश्चित करावी व दोषी असणार्या अधिकारी व कर्मचार्यांविरूध्द कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करावा असे आदेश प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी दिले होते.

साठे व त्यांच्या समितीने चौकशी केली असता शिर्डी उर्दू एज्युकेशन सोसायटी, पुनमनगर, शिर्डी यांच्या इकरा उर्दू शाळेतील चार शिक्षकांना यामध्ये खान जरीन मुख्तार, सय्यद समिना शब्बीर, शेख आस्मा रज्जाक व शेख नियाजउद्दीन सल्लाउद्दीन यांना २०१४ मध्ये वैयक्तिक मान्यता देण्यात आली होती. मात्र, ही मान्यता विहित कार्यालयीन कार्यपध्दती न वापरता, थेट प्रस्ताव घेऊन तत्कालीन प्रभारी अधिकारी आणि संबंधित कर्मचारी यांनी दिल्याचे निष्पन्न झाले. तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी सुलोचना पटारे, वरिष्ठ सहाय्यक वाघ (मयत) व तत्कालीन संस्थेचे सचिव रज्जाक अहमद शेख (मयत) यांनी खोटे जावक क्रमांक वापरून आणि खोटे दस्तऐवज तयार करून शासनाची फसवणूक केली असल्याचे चौकशी अहवालात स्पष्ट झाले आहे. २०१६ पर्यंत शिक्षकांना वैयक्तिक मान्यता नव्हती, तरीही २०१४ च्या नोंदींमध्ये खोटे आदेश दाखवून शिक्षकांना कायम स्वरूपी नोकरीत बसविण्यात आले. अशा प्रकारे बनावट कागदपत्रांचा वापर करून शासनाची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलीस उपनिरीक्षक देशमुख अधिक तपास करत आहेत.



नगर जामखेड रस्त्याच्या कामासाठी योग्य नियोजन करून वाहनचालकांच्या सुरक्षेच्या उपाय योजना करण्याचे निवेदन उपजिल्हाधिकाऱ्यांना देताना शिवसेनेचे पदाधिकारी.

## रस्त्याच्या नियोजनशून्य कामामुळे नागरिकांचे हाल

(पान १ वरुन)

असुन वाहने घसरून अपघात होत आहे. तसेच सदर रस्ता हा अरुंद असल्यामुळे दोन्ही बाजुकडुन येणारे वाहने रस्त्यावर बसत नसल्याने अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. महामार्गावर मदडगाव राजलक्ष्मी फांऊडेशनजवळ पुलाचे काम चालु असुन खोदकाम केलेले असल्याने सदर ठिकाणी योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात.महालक्ष्मी फर्निचर येथे जामखेड कडे जाणा-या लेनचे खोदकाम करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी रस्ता डायव्हर्जन केलेबाबतचे बोर्ड तसेच रेड रिफलेक्टर लावलेले बोर्ड सदर ठिकाणी दोन्ही बाजुने लावण्यात यावे.

उषा चौक इंडस्ट्रीज येथे देखील जाणारे लेनवर पुलाचे काम चालु असुन खोदकाम करण्यात आलेले आहे सदर ठिकाणी खोदकाम चालु असलेबाबतचे बोर्ड तसेच रस्ता डायव्हर्जन केले बाबतचे बोर्ड लावण्यात यावे. चिचोंडी पाटील गावचे अलीकडे जगदंबा फॅब्रीकेशन येथे रस्त्या पुर्णपणे खोदलेला असुन सदर ठिकाणी अंदाजे १० ते १५ फुट खाली खोदकाम करण्यात आलेले आहे सदर ठिकाणी अपघात होणार नाही या दृष्टीने उपायोजना करण्यात याव्यात. तसेच रस्ता डायव्हर्जन केले बाबत व रिफलेक्टर लावण्यात यावे जेणेकरुन रात्री वाहतूक करणारे वाहनांना अंदाज येईल व अपघात होणार नाही.

गणपती उत्सव हा मोठ्या प्रमाणात साजरा होत असल्याने महामार्गावर लोकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. महामार्गावरील अपघात होवु नये यासाठी आवश्यक असणाऱ्या उपायोजना करुन घेण्यात याव्यात जेणेकरुन गणपती उत्सव करीता जाणाऱ्या भाविकांना अडचण निर्माण होणार नाही तसेच अपघात होणार नाही.तरी वरील उपायोजना करुन केलेल्या कारवाईचा अहवाल ८ दिवसात सादर करावा असे पत्र महामार्ग पोलिस मदत केंद्राच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या उपअभियंत्यांना २१ ऑगस्ट रोजी देण्यात आले आहे.



पिंपळगाव माळवी कावळी तलाव ते खोसे, आढाव, झिने, लहारे वस्तीत जाणारा पानंद रस्ता अतिक्रमण मुक्त करून तात्काळ खुला करावा, अशी मागणी शिवप्रहार संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

## लोकवस्तीला रस्ताच नाही, नागरिकांचे हाल, रस्ता खुला करा, अन्यथा उपोषणाचा इशारा

### शिवप्रहार संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर - पिंपळगाव माळवी कावळी तलाव ते खोसे, आढाव, झिने, लहारे वस्तीत जाणारा पानंद रस्ता अतिक्रमण मुक्त करून तात्काळ खुला करावा, अशी मागणी शिवप्रहार संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी युवक तालुका अध्यक्ष गोरक्षनाथ आढाव, शिवाजी आढाव, विनायक झिने, आदिनाथ झिने, गोरक्षनाथ झिने, दत्तात्रेय झिने, सुधाकर झिने, सहदेव खोसे, शरद खोसे, सिंधुबाई खोसे, कैलास लहारे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, पिंपळगाव माळवी येथील कावळी तलाव ते लहारे वस्तीत सुमारे २०० ते २५० लोकसंख्या वास्तव्य करते. मात्र या वस्तीकडे जाण्यासाठी रस्त्याची सुविधा नाही. शेतकरी, दूध व्यवसायिक व शाळकरी मुलांना ये-जा करताना प्रचंड कसरत करावी लागते. रस्त्यालगत मोठी झाडी-झुडपे निर्माण झाली आहेत तसेच काही ठिकाणी शेतकऱ्यांनी पानंद रस्ता बंद केला आहे. पावसाळ्यात चिखलामुळे जाणे-अवघड होते, तर अलीकडे बिबट्याच्या हालचालींमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे पानंद रस्ता तातडीने अतिक्रमण मुक्त करून खुला करावा व खोसे वस्ती लगत कावळी तलाव शेजारील गट ची तहसीलदारांमार्फत मोजणी करून अतिक्रमण हद्द कायम करत रस्ता खुला करण्यात यावा. जर पुढील, १० दिवसांत या मागणीकडे दुर्लक्ष झाले, तर शिवप्रहार संघटना व पिंपळगाव माळवी ग्रामस्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ९ सप्टेंबर २०२५ पासून बेमुदत आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## स्टेशन रोड परिसरात मैलामिश्रीत पाण्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

### पाईपलाईनची दुरुस्ती करुन स्वच्छ पाणी द्या अन्यथा आंदोलन करणार

नगर - शहरातील स्टेशन रोड परिसरातील गवळीवाडा, बहरू चाळ, संभाजी कॉलनी, स्वामी समर्थ कॉलनी या भागात मागील एक ते दोन वर्षांपासून नागरिकांना मैलामिश्रीत दूषित पाणीपुरवठा होत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पाण्यातून पोटाचे विकार, त्वचारोग तसेच इतर आजार उद्भवू लागल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. या गंभीर समस्येबाबत उपाययोजना करून नागरिकांना तातडीने स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी महापालिका पाणीपुरवठा विभागाचे अभियंता गणेश गाडळकर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी भाजपचे दत्ता गाडळकर, विशाल खैरे, विजय गायकवाड, सुरेश लालबागे आदींसह नागरिक उपस्थित होते.



स्टेशन रोड परिसरात मैलामिश्रीत पाण्याने आरोग्य धोक्यात आल्याने पाईपलाईनची दुरुस्ती करण्याच्या मागणीचे निवेदन महापालिका पाणीपुरवठा विभागाच्या आयुक्तांना देण्यात आले.

गेल्या दोन वर्षांपासून या भागात नळातून येणारे पाणी अत्यंत घाण व मैलामिश्रीत असून, अनेकदा तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून दखल घेण्यात आलेली नाही. प्रत्यक्षात समस्येचे निराकरण झालेले नसल्याने नागरिकांना इतर ठिकाणाहून स्वच्छ पाणी आणावे लागत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

वर्षानुवर्षे दूषित पाणीपुरवठा करणे म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी खेळणे आहे. महापालिकेने तातडीने लक्ष घालून ही समस्या दूर करावी, अन्यथा नागरिकांसोबत रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा उपस्थितांनी यावेळी दिला.

## पावसामुळे मुख्य रस्ता खड्डेमय, नागरिकांची तारांबळ

भिंगार - परिसरातील सावतानगर पंपिंग स्टेशन ते पंचशील कमान हा मुख्य रस्ता पावसामुळे खड्डेमय झाला असून सुमारे दिड किलोमीटर रस्त्याचे दुरवस्था झाल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या रस्त्यावरून दररोज शाळकरी मुले, नोकरदार वर्ग, महिला व ज्येष्ठ नागरिक प्रवास करतात. मात्र खड्ड्यांमुळे वाहनचालकांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत असून अपघातांचा धोका सतत निर्माण होत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने खोली ओळखता येत नाही व त्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. स्थानिक रहिवाशांनी प्रशासनाविषयी नाराजी व्यक्त केली असून, या रस्त्याबाबत अनेकदा तक्रारी करूनही दखल घेतली जात नाही. आमच्या जिवाशी खेळ केला जात आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. तातडीने रस्ता दुरुस्त करा अन्यथा आंदोलनाचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## फॉरेस्ट ऑफिस समोरून मोटारसायकलची चोरी

नगर - नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या वन विभागाच्या कार्यालयासमोर लावलेली होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्र. एम एच १२ जे वाय ४६१०) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी ईश्वर लक्ष्मणराव मोरे यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## टाटा हॅरीयर कारची केडगाव येथून चोरी

नगर - बंगल्या समोर उभी केलेली टाटा कंपनीची हॅरीयर कार (क्र. एमएच १६ सी वाय १५१५) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना केडगावच्या भुषण नगर परिसरातील आनंद रो हौसिंग सोसायटीत २० ऑगस्ट रोजी रात्री ११.३० ते २१ ऑगस्ट रोजी सकाळी ६.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत शुभम दिपक जगताप (वय २८, रा. महावीर कॉलनी, सारसनगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची काळ्या रंगाची टाटा कंपनीची हॅरीयर कार भुषण नगरच्या आनंद रो हौसिंग सोसायटीत उभी करण्यात आलेली होती. ती अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली.या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (बी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नजमुन्नीसा तांबोळी यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - कडा येथील रहिवासी श्रीमती नजमुन्नीसा नुरमहंमद तांबोळी (वय ८७) यांचे २१ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर कडा कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला.

त्यांच्या मागे ५ मुले, ८ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान नुरमहंमद तांबोळी (पिंटू) तसेच अलंकार खानावळचे संचालक बबलू तांबोळी यांच्या त्या मातोश्री होत.

## सुरेश विधाते यांचे आकस्मिक निधन



नगर - चिचोंडी पाटील जवळील नांदूर येथील रहिवासी सुरेश (बापू) केरू विधाते (वय ४५) यांचे २२ ऑगस्ट रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर नांदूर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ भाऊ, भावजय, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते हॉटेल सात्विकचे संचालक होते.

## ज्योतीबाई माणिकजडे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील ज्योती रमेश माणिकजडे (वय ७२) यांचे २२ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. सोनार लेन येथील माणिकजडे ज्वेलर्सचे मालक सुहास, अजय, दिपक, कृष्णाराज व संतोष माणिकजडे यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

## प्रकाश जगताप यांचे दिर्घ आजाराने निधन



श्रीगोंदा - तालुक्यातील श्री क्षेत्र सुरेगाव येथील शेतकरी प्रकाश भगवान जगताप (वय ६७) यांचे २१ ऑगस्ट रोजी दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे ३ भाऊ, २ बहिणी, ४ मुली असा परिवार आहे. ते बुरुडगाव येथील शाहूराव कर्डिले यांचे जावई तसेच नगर येथील संबोधी कॉलेज मधील निवृत्त प्रा. भास्कर जाधव यांचे ते मामेभाऊ व मेव्हणे होत. त्यांच्या पार्थिवावर सुरेगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# भूमीहीन कुटुंबांना शासकीय जागेवर हक्क द्या, घरकुल योजनेची तातडीने अंमलबजावणी करा

### मागण्यांसाठी बसपाचे जिल्हा परिषदेत धरणे आंदोलन

नगर - शासकीय जागेवर राहणाऱ्या आदिवासी, भटके-विमुक्त, अनुसूचित जाती-जमाती व व्हीजीएनटी प्रवर्गातील भूमीहीन कुटुंबांना त्या जागेवरून विस्थापित न करता त्यांच्या नावावर हक्कपत्र देऊन तेथेच घरकुल योजना राबविण्याच्या प्रमुख मागणीसह इतर अनेक मागण्यांसाठी बहुजन समाज पार्टीच्या (बसपा) वतीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्हा प्रभारी सुनील ओहोळ, जिल्हा अध्यक्ष सुरेश कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, जिल्हा महासचिव मेजर राजू शिंदे, जिल्हा प्रभारी दत्तात्रय सोनवणे, कर्जत शहराध्यक्षा अलका कदम, नगर विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब काटे, जिल्हा सचिव चंद्रकांत दोंदे, त्रिंबक साळवे, रोहित साळवे, राहुरी विधानसभा अध्यक्ष संजय संसारे, राम ससाने, कचरू लष्करे, सुमन भोसले, सुवर्णा भोसले, किरण भोसले, अशोक तांबे, सुभाष साबळे, बलभीम घोडके आदींसह कार्यकर्ते व महिला सहभागी झाल्या होत्या.



भूमीहीन कुटुंबांना शासकीय जागेवर हक्क द्या, घरकुल योजनेची तातडीने अंमलबजावणी करा आदींसह विविध मागण्यांसाठी बसपाच्यावतीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही दलित-आदिवासी व भटके-विमुक्त समाज विकासापासून वंचित आहे. आजही भूमीहीन कुटुंबे शासकीय जागेवर अतिक्रमण करून राहत आहेत. शासनाने २०१८ मध्ये काढलेल्या अध्यादेशानुसार ही शासकीय जमीन त्यांच्याच नावावर करून देण्याचे धोरण जाहीर केले होते. त्याची अंमलबजावणी करुन ग्रामपंचायत नोंदीत कायमस्वरूपी नोंद लावून त्या कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

राज्यात गाजावाजा करण्यात आलेल्या अहिल्याबाई होळकर घरकुल योजना प्रत्यक्षात कार्यान्वित झालेली नाही. एकही घरकुल गरीब कुटुंबांना न मिळाल्याने शासनाने जनतेची फसवणूक केली असल्याचा आरोप बसपाच्या पदाधिकाऱ्यांनी केला. ही योजना तातडीने कार्यान्वित करून गरीबांना घरे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

तसेच संवर्ग १ मधील गंभीर आजाराने ग्रस्त शिक्षकांची तपासणी ससून रुग्णालय पुणे व जे.जे. रुग्णालय मुंबई येथे प्रशासनाच्या आदेशाने करण्यात आली आहे. तपासण्या झाल्यानंतर प्रमाणपत्रेही सादर असूनही त्यांना पुन्हा पुन्हा तपासणीसाठी पाठविणे हा मानसिक आणि भावनिक छळ असल्याचा आरोप बसपाच्या वतीने करण्यात आला. दोषी अथवा संशयित शिक्षकांवर कारवाई करावी, परंतु गंभीर आजारग्रस्त शिक्षकांना वेठीस धरू नये, अशी मागणीही आंदोलनात करण्यात आली.

# संपादकांना धमकी देणारा मोकाटच, बाळासाहेब आगे यांना संरक्षण द्यावे

श्रीरामपूर - दै.जयबाबाचे संपादक ॲड. बाळासाहेब आगे यांना जिवे मारण्याची धमकी देणारा आरोपी मोकाट असल्याने त्याला तातडीने अटक करावी आणि आगे यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घार्गे यांच्याकडे श्रीरामपुरातील पत्रकार संघटनांनी केली आहे.

श्रीरामपुरात नशेचे इंजेक्शन पकडल्यानंतर त्याचा गुन्हा दाखल झालेला असताना आणि त्याची पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बातमी प्रकाशित केल्यानंतर इन्स्टाग्रामवर गणेश मुंढे नावाच्या नशेच्या इंजेक्शन प्रकरणातील आरोपीने थेट मारण्याची धमकी दिली. याकडे एसपी घार्गे यांचे लक्ष वेधत सदर प्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होताच १० मिनीटात त्या आरोपीने इन्स्टाग्रामवरील धमकीचा मेसेज डिलीट केला. याचा अर्थ त्याचे लागेबांधे कोठे आहे? हे शोधावे, 'म्हतारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकायला नको, पोलीस दादापेक्षा कोणी दादा नाहीं, हेच कारवाई करून सिद्ध करावे, अशी मागणी करत सुनील मुथ्था यांनी आरोपी मोकाट असल्याने आगे यांच्या जिवीताला धोका असून त्यांना तातडीने पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशी सर्वांची मागणी असल्याचे सांगितले.



दै.जयबाबाचे संपादक ॲड. बाळासाहेब आगे यांना जिवे मारण्याची धमकी देणारा आरोपीला तातडीने अटक करून आगे यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे, या मागणीचे निवेदन श्रीरामपुरातील पत्रकार संघटनांच्यावतीने जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घार्गे यांना देण्यात आले.

पत्रकार संघटनांची एसपी घार्गेकडे मागणी : यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक गाडेकर, कार्याध्यक्ष विष्णू वाघ, प्रेस क्लबचे अध्यक्ष बाळासाहेब भांड, रमण मुथ्था, रमेश कोठारी, बद्रीनारायण वढणे, भास्करराव खंडागळे, सुनील मुथ्था, महेश माळवे, नागेश सावंत, नवनाथ कुताळ, अनिल पांडे, सुनील नवले, प्रदीप आहेर, रवि भागवत, देविदास देसाई, दिलीप दायमा, सुरेश कांगणे, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश रक्ताटे, उपाध्यक्ष सलिम पठाण, हरिभाऊ बिडवे, अशोक रणनवरे, मोहन जगताप, दिलीप लोखंडे, विकास बोर्डे, एकनाथ डांगे, संदीप शेरमाळे, राजेंद्र भोसले, एजाज सय्यद, शफीक शेख, सुहास शेलार, विष्णूपंत डावरे, संतोष बनकर, नितीन चित्ते, चंद्रकांत लांडगे, रामेश्वर आरगडे, बापूसाहेब नवले, तानाजी लामखेडे, अर्जुन राऊत, स्वामीराज कुलथे आदी यावेळी जिल्हा पोलीस प्रमुख घार्गे यांना निवेदन देण्यासाठी श्रीरामपूर पत्रकार संघ, श्रीरामपूर प्रेस क्लब, श्रीरामपूर मराठी पत्रकार संघ, इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच इतर पत्रकार संघटनांचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

पत्रकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर एसपी सोमनाथ घार्गे यांनी याबाबत योग्य ती दखल घेवून कारवाई केली जाईल, असे सांगितले.

### पत्रकाराला धमकी देणाऱ्यावर कारवाई करावी, जिल्हा पत्रकार संघाचे निवेदन

गुन्हा दाखल झाल्याची बातमी प्रसिद्ध करणाऱ्या श्रीरामपूर येथील पत्रकारास गुन्हेगारी प्रवृत्तीच्या गणेश मुंडे नावाच्या आरोपीने जिवे मारण्याची धमकी दिली. या गुन्हेगारावर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा यांनी पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सत्य बातमी प्रसिद्ध केलेल्या पत्रकारास जर अशा धमक्या येत असतील तर पत्रकारांनी वर्तमानपत्रे चालवायचे कसे? आणि सर्वसामान्य प्रश्नांना वाचा फोडायची कशी? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. त्यामुळे तातडीने कारवाई करावी असे गुंदेचा यांनी निवेदनात म्हटले आहे.

सेल्फ ॲडेसिव्ह पी व्हि सी वॉल टाईल्स, सेल्फ ॲडेसिव्ह वॉलपेपर,किचन वॉलपेपर, रोमन ब्लॉईंडस्, रोलर ब्लॉईंडस्, झेब्रा ब्लॉईंडस्, व्हर्टिकल ब्लॉईंडस, उडन ब्लॉईंडस्, कस्टमाईज ब्लॉईंडस्, चीक् ब्लॉईंडस्, तयार कर्टन्स, कर्टन क्लॉथ, कर्टन रॉड व फिटींग, मच्छर जाळी, आर्टिफिशियल ग्रास, धुळी पासुन संरक्षणसाठी प्लास्टीक तयार पडदे
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# महाराष्ट्र राज्य कुराश स्पर्धेत अहिल्यानगर संघास उपविजेतेपद


कोल्हापूर येथे झालेल्या सब ज्युनियर महाराष्ट्र राज्य कुराश स्पर्धेत अहिल्यानगर १७ पदके जिंकत उपविजेतेपद पटकाविणाऱ्या अहिल्यानगर संघासोबत प्रशिक्षक संजय धोपावकर, आदित्य धोपावकर आदी.

नगर – नुकत्याच कोल्हापूर येथे चालुक्य स्पोर्ट्स अकॅडमी न्यू पॅलेस येथे झालेल्या सब ज्युनियर महाराष्ट्र राज्य कुराश स्पर्धेत अहिल्यानगर संघाने आठ सुवर्ण, चार रौप्य, पाच कास्य पदक अशी कामगिरी करत १७ पदके जिंकत उपविजेतेपद पटकावले. तीन विविध वयोगटात सदर स्पर्धा झाली.

सुवर्णपदक विजेते खेळाडू खालील प्रमाणे – २४ किलो खालील वजनगट मुली १० ते ११ वयोगट स्वरा डहाळे – सुवर्णपदक, ३० किलो खालील मुले पार्थ दातरंगे – सुवर्णपदक, ३५ किलो खाली अनुज बोगा – सुवर्णपदक, ४५ किलो खाली विराट करंजुले – सुवर्णपदक, ५० किलो खाली सम्राट करंजुले – सुवर्णपदक, १२ ते १४ वयोगट ४४ किलो खालील गट ऋचा बोगा – सुवर्णपदक, ५२ किलो खालील गट सिद्धी दातरंगे – सुवर्णपदक, ४५ किलो खालील वजन गट मुले युवराज आव्हाड – सुवर्णपदक.

८ व ९ वर्ष वयोगट २४ किलो खालील वजन गट मुली आर्या शिंदे – रौप्यपदक, २५ किलो खालील वजन गट यशराज गोंधळे – रौप्यपदक, ३० किलो वरील वजन गट वंश बोरा – रौप्यपदक, १० ते ११ वयोगट ३६ किलो खालील मुली खनिका गुप्ता – रौप्यपदक, १० ते ११ वयोगट २५ किलो खालील गट मुले श्लोक सब्बन – कास्यपदक, ४० किलो खालील वजन गट मल्हार सुरसे – कास्यपदक, ५० किलो वरील वजनगट ओम पोकळे – कास्यपदक, १२ ते १४ वयोगट ४० किलो खालील मुली अनन्या लखापती – कास्यपदक, अमृता झिंजे – कास्यपदक.

सर्व खेळाडू यंग मेन्स ज्यूदो असोसिएशनच्या सिद्धिबाग ज्यूदो कुराश हॉलमध्ये सराव करतात. त्यांना राष्ट्रीय कीर्तीचे ज्यूदो–कुराश मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, आंतरराष्ट्रीय खेळाडू आदित्य धोपावकर, सिद्धिबाग ज्यूदो हॉलचे प्रशिक्षक पै. शुभम दातरंगे, अथर्व नरसाळे यांचे मार्गदर्शन लाभले. ज्यूदो संघटनेचे अध्यक्ष धनंजय जाधव व कुराश संघटनेचे अध्यक्ष सचिन जाधव यांचे प्रोत्साहन लाभले.

# कामिनी– एक गूढ रहस्य कादंबरीला हरीभाऊ आपटे राज्यस्तरीय पुरस्कार

## निमगाव वाघा येथील ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात होणार सौ. वसुधा देशपांडे यांचा गौरव






नगर – स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या हरीभाऊ आपटे राज्यस्तरीय उत्कृष्ट कादंबरी पुरस्कारासाठी सौ. वसुधा ज्ञानेश देशपांडे लिखित कामिनी – एक गूढ रहस्य या कादंबरीची निवड झाली आहे.

हा पुरस्कार ५ सप्टेंबर, शिक्षक दिनानिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे होणाऱ्या तिसऱ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात वसुधा देशपांडे यांना प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली.

सौ. वसुधा देशपांडे या ग्रंथालय शास्त्र विषयातील परीक्षा उत्तीर्ण असून, त्यांना साहित्याची विशेष आवड आहे. त्यांनी लिहिलेली कामिनी– एक गूढ रहस्य ही कादंबरी वाचकांना उत्कंठावर्धक आणि रहस्यमय विश्वात घेऊन जाते. याच कादंबरीला यापूर्वी जानेवारी २०२५ मध्ये राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार प्राप्त झाला होता. साहित्य क्षेत्रात योगदान देणाऱ्या नवोदित लेखकांना प्रोत्साहन मिळावे हा उद्देश ठेवून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.


सुदाम महाराज गोरखे गुरुजी व माजी मंत्री बबन पाचपुते यांच्या हस्ते अनिता काळे यांना रणरागिणी संघर्ष रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.

# रणरागिणी संघर्ष रत्न पुरस्काराने अनितताई काळे यांचा गौरव

नगर – येथील मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे यांना रणरागिणी संघर्ष रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. संघर्षनामाच्या वतीने सुदाम महाराज गोरखे गुरुजी व माजीमंत्री बबनराव पाचपुते यांच्या हस्ते काळे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पेडगाव रोड, श्रीगोंदा येथे झालेल्या या सन्मान सोहळ्याप्रसंगी आमदार विक्रम पाचपुते, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोस, माजी सभापती शिवाजीराव ढवळे, विजयाताई गारुडकर, राणीताई फराटे, मीराताई शिंदे, मेजर भीमराव उल्हारे आदी उपस्थित होते.

अनिता काळे या भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका असून, सर्वसामान्य घटकातील मुला–मुलींना विद्या दानाचे पवित्र कार्य करुन शालेय मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी ज्युदो व लाठी–काठीचे प्रशिक्षण मोहिम चालवित आहे. महिला सक्षमीकरणाचे कार्य करुन त्यांनी उत्तम प्रकारे महिलांचे संघटन केले आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी उद्योग, व्यावसायिक प्रशिक्षण राबविणे, विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान, चर्चासत्राच्या माध्यमातून महिलांना मार्गदर्शन करत आहेत. व्याख्यानातून राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार घराघरात पोहचवून सक्षम पिढी घडविण्याचे त्यांचे कार्य सुरु आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना रणरागिणी संघर्ष रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# महायुतीत जेथे सन्मानाने जागा मिळणार नाहीत तेथे स्वबळावर लढण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची तयारी

### जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत


जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या बैठक बोलताना जिल्हाध्यक्ष अशोक सावंत. यावेळी आ. काशिनाथ दाते, माजी आमदार चंद्रशेखर घुले प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

नगर – आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कटिबद्ध झाला आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात व शहरात या निवडणुका लढणार आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस राज्यातील महायुतीचा घटक पक्ष असल्याने जिल्हा परिषद, पंचायत समिती व महानगरपालिका निवडणुका महायुतीतच लढणार आहोत. जागावाटपासाठी घटक पक्षांशी चर्चा करणार आहोत. जिल्हात महायुतीच व्हावी अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. मात्र ज्याठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसची जास्त ताकद आहे त्या जागांवर आम्ही प्रबळ दावा करणार असून जर सन्मानाने जागा नाही मिळाली तर प्रसंगी त्याठिकाणी स्वबळावर लढत करण्यासही पक्षाची तयारी आहे. मात्र यासाठी राष्ट्रीय अध्यक्षांचा आदेश अंतिम राहील, असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांनी केले.

आगामी काळात काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिका निवडणुकांच्या नियोजनासाठी आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या श्रीगोंदा दौऱ्याचे नियोजन करण्यासाठी पार्टीची बैठक गुरवारी शासकीय विश्रामगृह येथे झाली. अशोकराव सावंत यांनी उपस्थितीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. या बैठकीस आ. संग्राम जगताप, आ. काशिनाथ दाते, माजी आमदार चंद्रशेखर घुले व राहुल जगताप, पणन महामंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, श्रीगोंदा साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, राहुरी साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे, माजी जिल्हाध्यक्ष घनश्याम शेलार, अण्णासाहेब शेलार, जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, युवक अध्यक्ष संतोष धुमाळ, महिला अध्यक्षा अशा निंबाळकर, अजित कदम, जिल्हा सचिव सचिन डेरे, कार्यालयीन सचिव साईनाथ भगत यांच्यासह सर्व सर्व तालुकाध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस, चिटणीस, व पदाधिकारी उपस्थित होते.

अशोक सावंत पुढे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सभासद नोदणीस जिल्ह्यातून मोठ्याप्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. राज्यातील दुसऱ्या नंबरची नोंदणी जिल्ह्यातील दक्षिण भागात होणार आहे. दक्षिण भागातील नगर शहर व सर्व तालुक्यांमध्ये पक्षाची मजबूत बांधणी झाली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व महापालिका निवडणुकांच्या जंगी तयारीसाठी १ सप्टेंबर पासून नगर शहरासह दक्षिण भागातील आठही तालुक्यांमध्ये मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यात पक्षाची ताकद वाढली असून आगामी काळात होणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नगर जिल्ह्यात एक नंबरचा पक्ष राहील. महानगरपालिकेसह जिल्हापरिषद व पंचायत समितीवरही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाच झेंडा फडकेल, असा विश्वास मला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे २९ ऑगस्टला श्रीगोंदा तालुका दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याचे व होणाऱ्या मेळाव्याचे नियोजन आजच्या बैठकीत झाले आहे. या मेळाव्यात पक्षाचे शक्तिप्रदर्शन होणार असून २० ते २५ हजार कार्यकते उपस्थित रहाणार आहोत, असेही सावंत यांनी सांगितले.

यावेळी आ.संग्राम जगताप, आ.काशिनाथ दाते, चंद्रशेखर घुले यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे यांनी आभार मानले.

# नेतृत्व ही केवळ एक पदवी नसून, ती एक जबाबदारी

## ॲड. गौरव मिरीकर यांचे प्रतिपादन; अशोकभाऊ फिरोदिया स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण सोहळा उत्साहात



अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधींचा पदग्रहण सोहळ्यामध्ये संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्यासमवेत ॲड. गौरव मिरीकर आदी.

नगर – नेतृत्व ही केवळ एक पदवी नसून, ती एक जबाबदारी आहे. युवकांनी ठाम ध्येय ठेवून प्रयत्न केल्यास नक्कीच स्वप्न पूर्ण होतात. जो बदल आपण समाजात अपेक्षित करतो तो सर्वप्रथम स्वतःमध्ये घडवणे आवश्यक आहे. अधिकार नेहमी जबाबदाऱ्यांमधूनच उदयास येतात. सामंजस्य, समन्वय आणि प्रामाणिकता हे नेतृत्वाचे मुख्य आधार आहेत, असे मार्गदर्शन करताना ॲड. गौरव मिरीकर यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल त्यांनी शिक्षक वर्गाचे कौतुक केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५–२६ या कालावधीसाठी विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधींचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून वरद संतोष लोखंडे, विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून श्रावणी मकरंद देशमुख, तर सहाय्यक विद्यार्थी प्रतिनिधी संचित विजय बारसे आणि सहाय्यक विद्यार्थिनी प्रतिनिधी समृद्धी शरद नमन यांची नियुक्ती करण्यात आली.

अशोकभाऊ फिरोदिया सभागृहात आयोजित या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त ॲड. गौरव मिरीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून राधिका मिरीकर, संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया तसेच सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी उपस्थित होते. प्रारंभी संस्थेचे दिवंगत प्रमुख कार्यवाह स्व. अशोकभाऊ फिरोदिया आणि स्व. शांतीकुमारजी फिरोदिया यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

शिक्षिका भारती हिंगे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. स्वागतगीताद्वारे मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

विशाल आहेर यांनी उपस्थितांचा परिचय करून दिला.

शिल्पा कळमकर यांनी निवड प्रक्रिया व विद्यार्थी प्रतिनिधींच्या कर्तव्याविषयी माहिती दिली. मनीषा कांबळे यांनी विद्यार्थ्यांच्या ध्येयधोरणांविषयी तसेच विशेष आवड–छंद जोपासण्याबद्दल माहिती दिली. या निमित्ताने निवड झालेल्या प्रतिनिधींना शोल्डर पिन, लाईन यार्ड व नेमप्लेट प्रदान करण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शालेय शिक्षकांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांची उपस्थिती या सोहळ्याला लाभली. सोनल शर्मा यांनी आभार मानले.



राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेच्या अहिल्यानगर शाखेतर्फे जालिंदर बोरुडे यांना सन्मानित करण्यात आले.

# जालिंदर बोरुडे कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित



नगर – महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना (पुणे) अहिल्यानगर शाखेच्या वतीने नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांना कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शहरात झालेल्या संघटनेच्या कार्यक्रमात जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त सचिव इंजि. प्रकाश भामरे व सेवानिवृत्त सहसचिव इंजि. मनोहर पोकळे यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्कार प्रदान करुन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी कोषाध्यक्ष नागनाथ बोल्ली, सचिव रामदास साळी, बाबासाहेब लांडगे, दिलीप थिटे आदी उपस्थित होते.

जालिंदर बोरुडे हे जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी असून, ते स्वखर्चाने फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या ३२ वर्षापासून शिबिर घेऊन हजारो गोरगरीब नेत्रदोष असलेल्या रुग्णांना मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया घडवून आणत आहे. या सेवेच्या माध्यमातून अनेकांना नवदृष्टी मिळाली आहे. तर नागरिकांना मरणोत्तर नेत्रदानासाठी प्रोत्साहित करुन अनेकांचे मरणोत्तर नेत्रदान घडवून आनले आहे. तसेच फाऊंडेशनच्या माध्यमातून अवयवदान जनजागृतीसह विविध सामाजिक उपक्रम सुरु आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेऊन यामध्ये बोरुडे यांच्या कार्याची दखल घेऊन सामाजिक उपक्रमात त्यांना राज्यात प्रथम क्रमांकाने कार्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.




नगर एमआयडीसी, नवनागापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थानात माहूर गडावरील रेणुका मातेची प्रतिकृती असलेल्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. धार्मिक व उत्साहापूर्ण वातावरणात हा सोहळा पार पडला. या सोहळ्याच्या निमित्ताने पंचक्रोशीतील भाविकांनी उपस्थित होते. नव्याने बसविण्यात आलेल्या देवीच्या मूर्तीला ५ किलो चांदीचा आकर्षक मुकुट अर्पण करण्यात आला.

# श्री रेणुका माता देवस्थान येथे मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

## माहूर गडावरील रेणुका मातेच्या प्रतिकृतीची स्थापना; देवीला ५ किलो चांदीचा मुकुट अर्पण

नगर – नगर एमआयडीसी, नवनागापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थानात माहूर गडावरील रेणुका मातेची प्रतिकृती असलेल्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. धार्मिक व उत्साहापूर्ण वातावरणात हा सोहळा पार पडला. या सोहळ्याच्या निमित्ताने पंचक्रोशीतील भाविकांनी उपस्थित होते. नव्याने बसविण्यात आलेल्या देवीच्या मूर्तीला ५ किलो चांदीचा आकर्षक मुकुट अर्पण करण्यात आला.

विधीवत मंत्रोच्चार, हवन, जाप व विविध धार्मिक विधींनी संपूर्ण मंदिर परिसराचे वातावरण प्रफुल्लीत झाले होते. प्राणप्रतिष्ठा विधी पूर्ण झाल्यानंतर शशिकांत गुप्ता, सौ. नीलम गुप्ता व अविनाश कांडेकर यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. तसेच यावेळी भगवान परशुराम यांच्या मुर्तीची देखील प्रतिष्ठापना करण्यात आली. याप्रसंगी अधिकृत ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर आदी उपस्थित होते.

माहूर गडावरील रेणुका माताची प्रतिकृती असलेली ही मूर्ती अत्यंत आकर्षक स्वरूपात साकारण्यात आली असून, तिच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

मूर्तीचे देखणे रूप, त्यावरील अलंकार आणि ५ किलो चांदीचा मुकुट सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. मंदिर परिसरात भाविकांचा ओघ दिवसभर सुरूच होता.

सोहळ्यानंतर भाविकांसाठी महाप्रसाद व भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामुळे श्री रेणुका माता देवस्थान परिसर भक्तिभावाने फुलला होता.

# अल करम हॉस्पिटलतर्फे मोफत सर्वरोग निदान शिबिरास प्रतिसाद


अल करम हॉस्पिटलच्या वतीने मोफत सर्वरोग निदान उपचार व औषधासह शिबिरामध्ये रुग्ण तपासणी करताना वैद्यकीय अधिकारी.

नगर – अल करम हॉस्पिटलच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मोफत सर्वरोग निदान उपचार व औषधासह शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला रुग्ण व नागरिकांकडून प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी तौफिक तांबोली, शेरअली शेख, एजाज तांबोली, डॉ. जहीर मुजावर, डॉ. जैनब पटेल, डॉ. नजमा जहीर, डॉ. अशपाक पटेल, शाहनवाज तांबोली आदी उपस्थित होते.

शिबिरात विविध आजारांवर तपासण्या व सल्ला रुग्णांना देण्यात आला. विशेषतः हर्निया, अपेंडिक्स, कॅथलॅब तपासणी, एन्जिओप्लास्टी, किडनी स्टोन, डायबेटीस, हृदयविकार, प्रोस्टेट सर्जरी, रक्तदाब, सांधेदुखी, पाठदुखी तसेच व्यंधत्व निवारण यांसारख्या गंभीर आजारांची तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टर्सनी रुग्णांना आवश्यक ते मार्गदर्शन करत औषधेही मोफत उपलब्ध करून दिली. तसेच सामान्य तपासण्यांमध्ये ब्लड प्रेशर, शुगर तपासणी, ईसीजी, एक्स–रे या सेवा पूर्णपणे विनामूल्य देण्यात आल्या. या सुविधांचा मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी लाभ घेतला.

डॉ. जहीर मुजावर यांनी सांगितले की, आजच्या काळात आरोग्याची समस्या ही सर्वांत गंभीर समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत समाजातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत दर्जेदार वैद्यकीय सेवा पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे. येत्या काळातही अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येईल.

समारोपप्रसंगी डॉ. अशपाक पटेल म्हणाले की, अशा सामाजिक वैद्यकीय शिबिरांमुळे गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळतो असे मत व्यक्त केले.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अहिल्यानगर उपकेंद्रात दूरस्थ पद्धतीने एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अ.नगर उपकेंद्रात शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून दूरस्थ व ऑनलाइन माध्यमातून एम.बी.ए. अभ्यासक्रमास प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील पदवीधर युवक – युवतींना नोकरी करत असतानाही उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.

विद्यापीठाने सुरू केलेल्या या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाचे वर्ग शनिवार व रविवारी भरवले जाणार असून, कमी शुल्कात एम.बी.ए. पदवी प्राप्त करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. नोकरी करणारे विद्यार्थी, महिला तसेच गृहिणी यांना त्यांच्या सोयीप्रमाणे हा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल, अशी सुविधा विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे.

अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी २६ ऑगस्ट ही अंतिम तारीख लक्षात ठेवावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. अधिक माहितीसाठी अहमदनगर उपकेंद्राच्या कार्यालयाशी ०२४१ २३२३६८२ किंवा ७७२१८२७९००.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## रिव्हर्स टोटल शोल्डर रिप्लेसमेंटच्या अंतरंगात...

**खांद्याची रचना**

आपला खांदा हा वरच्या हाताच्या हाडाने (ह्युमरस) आणि खांद्याच्या पातीने (स्कॅप्युला) बनलेला आहे. हाताच्या हाडाचे गोलाकार टोक (ह्युमरल हेड) खांद्याच्या पातीतील उथळ कप्प्यात (सॉकेट) बसलेले असते. यामुळे खांद्याला विस्तृत हालचाल करण्याची क्षमता मिळते. या सांध्याभोवती असलेले कूर्चा (कार्टिलेज), टेंडन आणि स्नायुबंध (लिगामेंट) हेदेखील स्नायूंची हालचाल सुरळीत करण्यास साहाय्य करतात.

**का करावी लागते शस्त्रक्रिया?**

काही कारणांमुळे किंवा बरेचदा चुकीच्या सवयींमुळे, अपघातांमुळे, जड वस्तू चुकीच्या पद्धतीने उचलल्यामुळे खांद्यात तीव्र वेदना सुरू होतात. परिणामी, दैनंदिन कामे करणे कठीण होते. काही वेळा खांद्यातील अशक्तपणामुळे हात पूर्णपणे हलवता येत नाही. औषध,



इंजेक्शन किंवा फिजिकल थेरपी यांसारख्या उपचारांनंतरही लक्षणे कमी होत नाहीत. फ्रोजन शोल्डरची तीव्र अवस्था असल्यास, खांद्याच्या सांध्याचे कार्य पूर्णपणे थांबलेले असल्यास रिव्हर्स टोटल शोल्डर रिप्लेसमेंट ही शस्त्रक्रिया करणे अपरिहार्य आणि लाभदायक ठरते.

या शस्त्रक्रियेचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे रोटेटर कफ टिअर आर्थोपॅथी म्हणजे खांद्याच्या सांध्यातील संधिवाताबरोबर रोटेटर कफ स्नायुबंध तुटलेले किंवा नष्ट झालेले असणे. अशा वेळी स्टॅंडर्ड खांदा प्रत्यारोपण यशस्वी ठरत नाही. कारण त्याला स्थिरतेसाठी आणि हालचालीसाठी रोटेटर कफची गरज असते. रिव्हर्स प्रत्यारोपण मात्र रोटेटर कफऐवजी डेल्टॉईड स्नायुचा वापर करून हात उचलण्याची क्षमता परत आणते.

**खांद्याच्या सांध्याला नुकसान होण्याची कारणे**

* ऑस्टिओआर्थरायटीस या आजारामुळे हाडांच्या टोकांवर असलेले कार्टिलेज खराब होते. यामुळे सांधा सुरळीतपणे हलू शकत नाही.

* रोटेटर कफ हा खांद्याच्या सांध्याभोवती असलेल्या स्नायू आणि टेंडन्सचा समूह आहे. हे स्नायू तुटल्यास किंवा त्यांना इजा झाल्यास खांद्याच्या कार्टिलेज आणि हाडांचे नुकसान होऊ शकते.

* वरच्या भागातील ह्युमरस हाडाच्या फ्रॅक्चरमुळे खांदा बदलण्याची गरज पडू शकते. विशेषत: जेव्हा आधीच्या शस्त्रक्रियेनंतर हाड नीट जुळले नसेल तर खांदाबदल गरजेचा ठरतो.

*रुमॅटोइड आर्थरायटीस आणि इतर काही संसर्गजन्य आजारांमध्ये रोगप्रतिकारक प्रणाली अतिसक्रिय होऊन कार्टिलेजबरोबरच हाडांचेही नुकसान करू शकते.

*ऑस्टिओनेक्रोसिससारख्या काही खांद्याच्या आजारांमध्ये ह्युमरसला पुरेसा रक्तप्रवाह मिळत नाही. त्यामुळे हाड कमकुवत होऊन तुटू शकते.

**कशी होते शस्त्रक्रिया?**

रिव्हर्स टोटल शोल्डर रिप्लेसमेंट ही खांद्यावरील एक विशेष प्रकारची शस्त्रक्रिया आहे. या शस्त्रक्रियेत डॉक्टर खांद्याच्या सांध्यातील खराब किंवा नुकसान झालेल्या भागांना काढून टाकतात आणि त्याऐवजी कृत्रिम भाग बसवतात. सामान्य खांदा प्रत्यारोपणात कृत्रिम गोल (बॉल) हाताच्या हाडावर आणि कप्पा (सॉकेट) खांद्याच्या पातीवर बसवतात. परंतु रिव्हर्स प्रत्यारोपणात हे उलटे असते. खांद्याच्या पातीच्या बाजूस गोल आणि हाताच्या हाडाच्या बाजूस कप्पा बसवला जातो. त्यामुळे या प्रकाराला 'रिव्हर्स' असे नाव आहे. यामध्ये कप्पा धातूच्या दांडीने (स्टेम) ह्युमरस हाडात बसवला जातो, तर बॉल खांद्याच्या पातीला स्क्रू आणि धातूच्या प्लेटने जोडला जातो.

■ डॉ. सम्यक पंचोली
(लेखक शोल्डर आणि अप्पर लिंब सर्जन आहेत.)
संपर्क ८९८९३२९३२९

*हात वर उचलता न येणे, खांद्याच्या पुढच्या बाजूस हाडाची फुगीर हालचाल दिसणे, खांद्याची हाडे गंभीररित्या मोडणे, विशेषतः बॉल हाडाजवळील किंवा बॉल तुकडे होणे, ट्यूमरमुळे हाड काढावे लागणे अशा स्थितीत ही शस्त्रक्रिया प्रभावी ठरते.

*** किती टक्के यशस्वी?**

आजवरच्या पाहण्यांनुसार या शस्त्रक्रियेमुळे ८५-९०% रुग्णांमध्ये उत्कृष्ट परिणाम दिसून येतात. बहुतेक रुग्ण डोक्याच्या वर हात नेऊ शकतात, परंतु बाजूला हात पसरवण्याची क्षमता हळूहळू प्राप्त होते. साधारणतः या शस्त्रक्रियेसाठी २-३ दिवस रुग्णालयात राहावे लागते. ९० टक्के रुग्णांमध्ये हा सांधा १५ वर्षे टिकतो.

*या शस्त्रक्रियेदरम्यान जनरल ॲनेस्थेशिया किंवा नर्व ब्लॉक करून खांद्यावर चीर देऊन खराब हाड व ऊतक काढून टाकले जाते. सॉकेट बाजूस धातूची प्लेट व स्क्रू बसवून त्यावर बॉल बसवला जातो. तसेच ह्युमरस हाडात रॉड व त्यावर प्लास्टिक सॉकेट बसवले जाते. यानंतर स्नायु व त्वचा टाके किंवा स्टेपल्सने बंद केल्या जातात.

**काय काळजी घ्यावी?**

शस्त्रक्रियेपूर्वी एक्स-रे, सीटी स्कॅन, एमआरआय यांसारख्या तपासण्या करून हाडे व मऊ ऊतकांची अचूक माहिती घेतली जाते. रुग्णाने घेत असलेल्या सर्व औषधांची माहिती डॉक्टरांना देणे आवश्यक असते. तसेच रक्त पातळ करणारी औषधे (ब्लड थिनर्स) थांबवण्याबाबत सल्ला घ्यावा. तसेच शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरनी सांगितलेली पथ्ये पाळणे आणि औषधे नियमित व वेळेवर घेणे आवश्यक आहे.

◆◆◆

## खताचा वापर कमी करण्यासाठी...

जीवाणू हे हानिकारकच असतात असे नसते. आपल्या आतड्यांमधील जीवाणू हे आपल्या पचनसंस्थेचाच एक अविभाज्य भाग बनलेले असतात. त्यांची संख्या चांगली असणे, हे आरोग्यासाठी लाभदायकच असते. पोटातील अशा उपकारक जीवाणूंप्रमाणेच वृक्षांनाही जीवाणू मदत करीत असतात, असे दिसून आले आहे. वृक्षांच्या वाढीसाठी आवश्यक अशी पोषके हे जीवाणू तयार करतात. वृक्षांमधील मायक्रोबायोमचा शोध वैज्ञानिकांनी घेतलेला असून, वृक्ष माणसाप्रमाणे चालू शकत नसल्याने त्यांना अन्नासाठी या जीवाणूंवर अवलंबून राहावे लागते, असे दिसून आलेले आहे. जीवाणूंच्या मदतीने ते पोषके तयार करतात. कृषिक्षेत्रात खतांचा वापर कमी करण्यासाठी असे सूक्ष्म जीवाणू उपयुक्त ठरू शकतात, असे तज्ज्ञांचे मत आहे.



वॉशिंग्टन विद्यापीठाच्या संशोधकांनी अतिशय खडकाळ अशा भागात असलेल्या पॉपलर वृक्षांमध्ये जीवाणू पोषके तयार करतात, हे दाखवून दिलेले आहे. शिवाय या पोषकांमुळेच हे वृक्ष वाढत असतात. सूक्ष्मजीव विविध प्रकारचे असतात. या संशोधनामुळे कृषी पिके व जैवऊर्जा पिके यांच्याकरिता उपयोग होऊ शकतो. काही विशिष्ट सूक्ष्म जीवाणू हे जैविक क्रियांच्या आधारे वृक्षांना त्यांचे अन्न तयार करण्यास मदत करीत असतात, असे शॅरॉन डॉटी यांनी म्हटले आहे.

नायट्रोजन स्थिरीकरण ही नैसर्गिक प्रक्रिया असून, ती जीवाणूंसाठी आवश्यक असते. नैसर्गिक अवस्थेत कमी पोषके खडकाळ, उजाड माळरानावरही वृक्षांत असतात; पण जीवाणू नायट्रोजन स्थिरीकरणाच्या माध्यमातून पोषकांचे प्रमाण वाढवतात. डाळी, सोयाबीन, लवंगा, अल्फाल्फा व ल्युपाईन्स या वनस्पतींत नायट्रोजन स्थिरीकरण जीवाणूंमुळे जास्त चांगले होते. जीवाणू हे वातावरणातील नायट्रोजनचे स्थिरीकरण करण्यात वनस्पतींच्या मुळांना मदत करतात. या सहजीवनातून मुळांच्या माध्यमातच नायट्रोजन स्थिरीकरण होते, असे मानले जात होते; पण फांद्याच्या माध्यमातूनही ते होते. त्यात मुळांवरील विशिष्ट जैविक यंत्रणा गरजेची नसते.

साधारणत: कृषी पिकांच्या वाढीसाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे. जंगली पॉपलर, विलो वनस्पती यांच्यापासून मिळवलेले जीवाणू हे मका, टोमॅटो व ढोबळी मिरची यांना वाढीस मदत करतात. त्यात जास्त खते वापरावी लागत नाहीत. खतांचे संश्लेषण हे जीवाश्म इंधनांमुळे होते, त्यामुळे खतांच्या किमती जास्त असतात. कृषी व जैवऊर्जा पिके वाढवण्यासाठी खतांचा वापर होत असतो. गोल्फ मैदानावरील हिरवळीसह अनेक ठिकाणी खतांचा वापर करावा लागतो. खतांची अनेकदा पुरेशी उपलब्धता नसते, त्यामुळे वनस्पतींना उपयोगी ठरणारे जे जीवाणू खडक व वाळूत असतात, त्यांचा उपयोग प्रत्यक्ष पिकांसाठी करता येऊ शकतो. एरवी हे जीवाणू उजाड माळरानावरील वनस्पती वापरत असतात. त्यामुळे खतांचा वापर तर कमी होईल शिवाय उत्पादकताही वाढेल, असे 'प्लॉसवन' या नियतकालिकातील शोधनिबंधात म्हटले आहे. ◆◆◆

## प्रेमात पडला आहात? मग हे वाचा!

प्रेम ही सर्वात सुंदर मानवी भावना आहे असे मानले जाते. जेव्हा एखादी व्यक्ती प्रेमात पडते तेव्हा त्याची झोप आणि मनःस्थिती पूर्णपणे बिघडून जाते. ना त्या व्यक्तीला भूक लागत ना त्याला कोणत्याही गोष्टीचं भान राहत नाही. प्रेमात पडलेली व्यक्ती पूर्णपणे प्रेमाच्या आणि त्या व्यक्तीच्या विचारात असते. अनेक मोठी मंडळी याना 'प्रेमात वेडं होणं' असं म्हणतात, पण तुम्हाला माहीत आहे का? की प्रेमात पडलेल्या व्यक्तीची झोप का उडते? काय आहे यामागचं खरं आणि शास्त्रीय कारण? प्रेमाचा परिणाम शरीरावर अगदी नशेच्या पदार्थांसारखा होत असते. अमेरिकेतील न्यू जर्सी येथील रटगर्स युनिव्हर्सिटीच्या संशोधनात प्रेम आणि नशेचे व्यसन यांच्यातील संबंध दिसून आला आहे. संशोधनानुसार, जेव्हा कोणी नशेचे पदार्थ घेते तेव्हा त्याच्या रक्तात डोपानाइन, ऑक्सीटोसिन, ॲड्रेनालिन आणि व्हॅसोप्रेसिन सारखी अनेक रसायने बाहेर पडू लागतात, ज्यामुळे शरीरात एक वेगळाच आनंद जाणवतो.



या शोधात तो पुन्हा नशेच्या शोधात राहते आणि हळूहळू व्यसनाधीन होतो. (आणि शेवटी सत्यानाश होतो!) खाद्याला तहान लागल्यावरही ते मेंदूमध्ये डोपामाइन आणि ऑक्सिटोसिन सोडते. शरीर आणि मन त्याचा आनंद घेतात. हे पुन्हा अनुभवण्यासाठी तो त्याच्या प्रेमाच्या म्हणजेच जोडीदाराजवळ राहतो, त्या व्यक्तीला मिस करतो आणि फोनवर सतत बोलण्याचा प्रयत्न करतो. हळूहळू माणसाला त्याचे व्यसन लागते. प्रेमाच्या या नशेत शरीरात अतिरिक्त ऊर्जा निर्माण होते, त्यामुळे अतिक्रियाशीलता जाणवते आणि झोप निघून जाते. 'बिहेवियरल स्लीप मेडिसिन'मधील संशोधनात असे दिसून आले आहे की, झोपेवर प्रेमाचा प्रभाव लिंगानुसार बदलतो. प्रेमात असलेल्या मुलींच्या झोपेवर मुलांपेक्षा जास्त परिणाम होतो. बऱ्याच प्रकरणांमध्ये, हा प्रभाव दुप्पट देखील असू शकतो. असंही होऊ शकतं की, ब्रेकअप झाल्यावर मुलगी रात्रभर जागे राहते आणि मुलगा पाय पसरून आरामात झोपतो. याचे कारण म्हणजे मुलींचे भावनिक होणे आणि त्यांचे हार्मोनल असंतुलन याचा परिणाम झोपेवर होतो.

जर प्रेम नवीन असेल तर ते रात्रभर जागे राहण्यास भाग पाडते परंतु जेव्हा प्रेम जुने किंवा त्याचे नात्यात रूपांतर झाले असेल तर त्याची तीव्रता कमी होते. 'युनिव्हर्सिटी ऑफ तुर्कियें'मध्ये ६०० जोडप्यांवर केलेल्या संशोधनात असे आढळून आले की, जर प्रेमळ जोडीदार असेल तर झोपेची गुणवत्ता खूपच चांगली होते. हे अगदी आई आणि मुलाच्या प्रेमासारखे आहे. ज्याप्रमाणे आपल्या आईजवळ झोपलेल्या मुलाला सुरक्षित वाटते, तिने त्याच्या डोक्याला हात लावला किंवा थोपटले की लगेच झोपायला लागते, अशीच भावना प्रेमळ जोडीदाराच्या बाबतीत घडते. मग त्याचा जोडीदार सुरक्षित, आरामशीर वाटते आणि गाढ झोप लागते.

◆◆◆

## तीन चिनी अंतराळवीर 'रवाना'



पृथ्वीच्या कक्षेत फिरत असलेल्या आणि सध्या सुनीता विल्यम्स जिथे राहत आहे त्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाप्रमाणेच चीनने स्वतःचेही एक अंतराळ स्थानक बनवलेले आहे. याठिकाणीही ठराविक कालावधीनंतर अंतराळवीरांचे नवे नवे पथक राहण्यासाठी जात असते. आताही 'शेनझु-१९' मोहिमेतून चीनचे तीन अंतराळवीर या तियांगोंग अंतराळ स्थानकावर रवाना झाले. त्यामध्ये चीनच्या पहिल्या महिला स्पेस फ्लाईट इंजिनिअरचाही समावेश आहे. ही नवी तियांगोंग टीम २०३० पर्यंत चंद्रावर अंतराळवीरांना पाठवण्याच्या व चंद्रावर एक लुनार बेस म्हणजेच तळ निर्माण करण्याच्या महत्त्वाकांक्षी मोहिमेच्यादृष्टीने काम करील. चीनच्या 'शिन्हुआ' या माध्यमाने याबाबतची माहिती दिली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की 'शेनझु-१९' मोहिमेसाठी अंतराळ संशोधकांचे हे त्रिकुट मंगळवारी पहाटे वायव्य चीनच्या जिऊक्वान सॅटेलाईट लाँच सेंटरवरून रवाना झाले. चालक दलामध्ये सहभागी असलेली ३४ वर्षांची वांग हाओजे ही चीनची एकमेव महिला स्पेस फ्लाईट इंजिनिअर आहे. एखाद्या क्रु मिशनमध्ये सहभागी होणारी ती तिसरी चिनी महिला आहे. वांगने मोहिमेवर रवाना होण्यापूर्वी सांगितले की तिने अंतराळ स्थानकावर जाण्याचे स्वप्न पाहिले होते जे आता पूर्ण होत आहे. कै जुजे यांच्या नेतृत्वाखालील हे पथक एप्रिलच्या अखेरीस किंवा मे महिन्याच्या प्रारंभी पृथ्वीवर परत येईल. कै जुजे हे ४८ वर्षांचे असून त्यांना २०२२ मधील 'शेनझु-१४' मोहिमेचा अनुभव आहे. तिसरे अंतराळवीर ३४ वर्षांचे सोंग लिंगडोंग हे आहेत. चीनने २०१९ मध्ये चंद्राच्या सुदूर भागात 'चांगी-४' हे आपले यान उतरवले होते. असे करणारा तो पहिलाच देश ठरला होता. ◆◆◆

## प्रकाशदायी बेडूक



शरीरातून प्रकाश उत्सर्जित करणारा आपल्या परिचयाचा कीटक म्हणजे काजवा. अशी क्षमता अनेक जीवांमध्ये तसेच सूक्ष्म शैवालांमध्येही असते. अंधारात निळसर हिरवट रंगाच्या प्रकाशात प्रकाशित होणारा पहिला बेडूक अर्जेंटिनात सापडलेला आहे. त्याच्यात हिरवा, पिवळा व तांबडा रंग प्रकाशित रूपात दाखवण्याचीही क्षमता असते; पण अंधारात तो निळा व हिरवा प्रकाश बाहेर टाकतो. कमी तरंगलांबीचा प्रकाश शोषून जास्त तरंगलांबीचा प्रकाश बाहेर टाकण्याच्या गुणधर्माला प्रदीप्तता म्हणतात. उभयचरांमध्ये हा गुणधर्म यापूर्वी दिसलेला नव्हता.

संशोधकांनी साऊथ अमेरिकन पोलका डॉट ट्री म्हणजे हिप्सीबोअस पंकटॅटॅस हा बेडूक शोधला आहे. हा बेडूक प्रदीप्त रेणूंचा वापर करत असतो; पण हे रेणू इतर प्राण्यांच्या प्रदीप्त रेणूंपेक्षा वेगळे असतात. महासागरातील अनेक प्राणी प्रदीप्तता दाखवतात; त्यात प्रवाळ, मासे, शार्क व हॉकबील कासव (एरेटोमोचेलीस इंब्रिकाटा) यांचा समावेश आहे. प्राण्यांमध्ये हा गुणधर्म कोठून येतो हे समजलेले नाही. एकमेकांना संदेश पाठवणे, रंग बदलून स्वसंरक्षण करणे, जोडीदाराला आकर्षित करणे हे त्याचे हेतू असू शकतात. बेडकांमध्ये लाल रंगाचा प्रकाश असू शकतो कारण त्यांच्यात बिलिबेरदीन हे रंगद्रव्य असते. या रंगद्रव्याने उभयचरांच्या ऊती व हाडे हिरवा प्रकाश उत्सर्जित करतात. काही कीटक बिलबिरदीनशी संबंधित असून ते क्षीण लाल प्रकाश बाहेर सोडतात, असे अर्जेंटिनाच्या ब्युनोस आयर्स विद्यापीठाचे कालरेस तबोडा यांनी म्हटले आहे.

पोलका डॉट ट्री हा बेडूक वेगळा असून तो निळ-हिरवा प्रकाश उत्सर्जित करतो. सांता फे अर्जेंटिना येथे पोलका डॉट ट्री बेडूक सापडले असून, ते हिरवा व निळा प्रकाश उत्सर्जित करतात. हायलॉइन एल १, हायलॉईन एल २, हायलॉईन जी १ रेणू त्यांच्या लसिका पेशी, त्वचा व इतर ठिकाणी असतात. त्यामुळे ते हिरवा प्रकाश उत्सर्जित करू शकतात. त्यामध्ये अगदी वेगळ्या प्रकारची हायड्रोकार्बन शृंखला असते व ती इतर कोणत्याही प्राण्यात नसते. चंद्राप्रमाणे १८ टक्के दृश्य प्रकाश हे रेणू बाहेर टाकतात. या बेडकांना त्यांचा स्वतःचा प्रकाश दिसतो की नाही हे माहिती नाही. हे संशोधन 'जर्नल प्रोसिडिंग्ज ऑफ नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस' या नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे. ◆◆◆

## विचारांच्या प्रक्रियेचे चित्रण

मानवी मेंदू ही निसर्गाची सर्वात गुंतागुंतीची आणि म्हणूनच सर्वात अफलातून अशी निर्मिती आहे. माणसाची विचार प्रक्रिया ही एक असामान्य अशीच बाब आहे. विशेष म्हणजे मानवी विचारांच्या प्रक्रियेचे एफएमआरआयच्या तंत्राने चित्रण करण्यातही यश आलेले आहे. मानवी विचार असे वेगळे काढून दाखवता येत नाहीत, पण त्याच्या प्रक्रियेचे चित्रण शक्य झाले आहे. फंक्शनल मॅग्नेटिक रेझोनन्स म्हणजे एफएमआरआय या तंत्राने रक्तातील ऑक्सिजनचे बदल टिपता येतात.



न्यूरॉन्सच्या क्रियाशीलतेमुळे होणारे बदल पूर्वी टिपण्यास खूप क्षीण मानले जात होते. नवीन संशोधनानुसार एफएमआरआय पद्धतीने मेंदूतील स्पंदने टिपली जातात. मेंदू विज्ञानात मेंदूचे मॅपिंग करताना याचा उपयोग होणार असून त्यात आकलन, लक्ष, केंद्रीकरण व जाणीव या पातळीवर घडणाऱ्या क्रियांची उकल होऊ शकते. आरोग्यपूर्ण मेंदू जोडण्या व डिमेन्शिया व इतर विकार झालेल्या लोकांच्या मेंदूतील जोडण्या यातील फरक त्यामुळे टिपता येणार आहे. असे यूएस नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बायोमेडिकल इमेजिंग अँड बायोइंजिनिअरिंग या संस्थेने गियोयिंग लिऊ यांनी म्हटले होते. एफएमआरआय तंत्राने रक्तात ऑक्सिजनचे प्रमाण थोडे वाढले तरी समजते व हे तंत्र मेंदूतील दृष्टी, श्रवण व स्पर्श यांच्या नियंत्रणाशी संबंधित भागांकरता वापरता येईल. प्रमाणित एफएमआरआय तंत्राने मेंदूतील काही भागांचे आकलन नीट होत नाही कारण ३० सेकंदांच्या प्रकाशाला मेंदू कसा प्रतिसाद देतो हे समजणे सोपे नसते. आता मानवी विचार प्रक्रियेचा अभ्यास करताना वैज्ञानिकांनी मेंदूतील स्पंदने उपयोजित जलद एफएमआरआय तंत्रांचा अवलंब केला आहे. मेंदूच्या व्हिज्युअल कॉर्टेक्समधील बदल यात चेकबोर्ड पॅटर्नमध्ये दिसले, असे मॅसॅच्युसेटस् जनरल हॉस्पिटलचे जोथन पॉलिमेनी यांनी सांगितले. नेहमीच्या एफएमआरआयमध्ये जी स्पंदने दिसत नव्हती ती अभ्यासण्यात यश आले आहे. पीएनएएस या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.

◆◆◆

## नंगा पर्वत एव्हरेस्टवर मात करणार?

जगातील सर्वात उंच अशी दहा पर्वतशिखरे हिमालयातच आहेत. त्यामध्येच माऊंट एव्हरेस्टचा समावेश होतो जे पृथ्वीवरील सर्वात उंच पर्वतशिखर आहे. मात्र, भविष्यात नंगा पर्वत एव्हरेस्टपेक्षाही अधिक उंच होऊ शकतो असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अर्थातच हे पर्वतशिखरही हिमालयातच आहे.

जेव्हा दोन टेक्टोनिक प्लेटस्ची टक्कर होते तेव्हा ते तयार होतात. एक दुसऱ्याच्या खाली जातात. मग त्याच्या वरच्या भागाला म्हणजेच कवचाला उंची प्राप्त होते. पर्वताच्या निर्मितीची ही सर्वसाधारण व्याख्या आहे, पण त्यात इतरही अनेक घटक काम करतात. धडकेची तीव्रता, कवचाचे तापमान, जाडी अशा गोष्टी. पृथ्वीच्या वरच्या पृष्ठभागावरील कवचाचा जेलसारखा विचार केल्यास ते समजून घेणे सोपे जाईल. कोल्ड जेल जास्त वाढू शकते, पण गरम जेल कमी उत्पन्न होते. एबरडीन विद्यापीठातील भूगर्भशास्त्रज्ञ रॉब बटलर यांनी सांगितले की, दरवर्षी एव्हरेस्टची उंची वाढत आहे. सुमारे एक इंच. याचे कारण म्हणजे सभोवतालची सततची धूप. नुकताच एक अभ्यास करण्यात आला होता ज्यात एव्हरेस्टपासून ७२ किमी अंतरावर नद्यांचे जाळे असल्याचे सांगण्यात आले होते. ज्यामुळे एव्हरेस्ट ८९ हजार वर्षांत ४९ वरून १६४ फुटांवर पोहोचला आहे. युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनचे भूगर्भशास्त्रज्ञ मॅथ्यू फॉक्स म्हणतात की, क्षरणामुळे एव्हरेस्टच नव्हे तर अनेक पर्वतांची उंची वाढू शकते. हे कधीकधी देखील होऊ शकते. हे क्षरण आणि उत्थानाच्या दरातील फरकावर अवलंबून असते. उत्कर्षाचा दर जास्त असेल तर डोंगर उंचावेल. जर धूप जास्त असेल तर ती बुडेल. जगातील नवव्या क्रमांकाचा आणि एव्हरेस्टच्या शेजारी असलेला नंगा पर्वत अतिशय वेगाने वाढत आहे. एक दिवस तो एव्हरेस्टपेक्षाही अधिक उंच होईल. आजूबाजूची धूप हे यामागचे कारण आहे. एव्हरेस्टच्या वाढीचा दर नंगा पर्वतापेक्षा कमी आहे. एव्हरेस्ट नंगा पर्वतापेक्षा केवळ २००० फूट उंच आहे. भविष्यात एव्हरेस्टपेक्षाही उंच होऊ शकतो 'हा' पर्वत!



